# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३६२-२२ दिनांक २९/११/२०२२

## समुद्रात उडी मारुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्याचे पोलिसांनी वाचवले प्राण

दि.२५/११/२०२२ रोजी सायंकाळी ०६.३० वा. चे सुमारास नवघर पोलीस ठाणे हद्दीत जेसलपार्क खाडी, भाईंदर पुर्व येथे इसम नामे प्रदिप उदयराज उपाध्याय, वय ४३ वर्षे, रा.भुमी प्लाझा, रुम नंबर ३०१, नागेश्वर गेट, अलकापुरी, नालासोपारा पुर्व ता.वसई, जि.पालघर याने आत्महत्या करण्यासाठी भाईंदर खाडीमध्ये रेल्वे पुलावरुन उडी मारली होती. सदर बाबत पेट्रोलींग दरम्यान फिरत असलेले बिट मार्शल क्र.०१ वरिल पोलीस अंमलदार/१४२०९ भोये तसेच होम/६८०१ गोतरणे यांना डायल-११२ वर नियंत्रण कक्ष, मिरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय यांचेकडुन माहिती प्राप्त होताच लागलीच त्यांनी घटनास्थळवर जावुन सागरी गस्तीवर असलेले पोउनि/शिरसाठ, पोउनि/कोयंडे नेम.भाईंदर पोलीस ठाणे, पोउनि/जुनेरे सागरी सुरक्षा शाखा, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांच्या मदतीने स्पिड बोटीच्या सहाय्याने सदर ठिकाणी जाऊन उडी मारणारा इसम प्रदिप उदयराज उपाध्याय यास भाईंदर खाडीमधुन सुखरुप बाहेर काढले. उडी मारणारा इसम यास पुढील चौकशीकामी नवघर पोलीस ठाण्यात घेवुन जाऊन प्रदिप उदयराज उपाध्याय याचा भाऊ रुपेश उदयराज उपाध्याय, वय ४२ वर्षे, रा.रजनी अपार्टमेंट, ओसावाल नगरी, नालासोपारा पुर्व ता.वसई, जि.पालघर यास संपर्क साधुन बोलावण्यात आले. प्रदिप उदयराज उपाध्याय याचे मनपरिवर्तन करुन त्यास त्याचे भावाचे ताब्यात सुखरुप देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोउनि/शिरसाठ, पोउनि/कोयंडे नेम.भाईंदर पोलीस ठाणे, पोउनि/जुनेरे सागरी सुरक्षा शाखा, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय, पोशि/१४०२९ भोये तसेच होम/६८०१ गोतरणे नेम.नवघर पोलीस ठाणे यांनी केली आहे.

